एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज

# फळ बाग लागवड पूर्वतयारी



आपल्या सातारा जिल्ह्यातील हवामान फळबाग लागवडीसाठी खुपच अनुकूल आहे. जिल्ह्यात महाबळेश्वर तालुका स्ट्रॉबेरीसाठी प्रसिद्ध आहे तर जवळपास सर्व तालुक्यात आंबा लागवड केला जातो.

आपल्या जिल्ह्याचे विचार करता आंबा, केळी, चिकू, पपई, पेरू, लिंबू आणि नारळ व कोरडवाहू भागात आवळा, चिंच व सीताफळ अशा प्रकारची फळ झाडे घ्यावीत. हवामानानुसार फळझाडांची लागवड न केल्यास फळे न येणे, फळे लागल्यास फळांची प्रत खालावणे, उशिरा फळे लागणे, रोग व किडींचा प्रादुर्भाव इत्यादी समस्या भेडसावतात म्हणून हवामानानुसार फळझाड लागवड करावी. पारंपरिक पिकांना फाटा देऊन आपल्या जमिनीत शास्त्रोक्त पद्धतीने फळझाडे लागवड केल्यास निश्चित फायदा होणार.

**खड्डे करणे व खड्डे भरणे**

सर्वसाधारणपणे मोठ्या आकाराचे खड्डे हलक्या जमिनीत व मोठ्या विस्ताराच्या झाडासाठी घ्यावेत. दिर्घायुषी झाडे असतील तर १÷१÷१ मी. आकाराचा खड्डा घ्यावा. मध्यम आकाराच्या झाडांना ७५÷७५÷७५ से. मी. व लहान झाडांना ६०÷६०÷६० से.मी आकाराचे खड्डे घ्यावेत. जमीन डोंगर उताराची असेल तर समपातळी रेषा काढून त्याप्रमाणे लागवड करावी. पूर्व मशागतीची कामे झाल्यानंतर एप्रिल - मेमध्ये फळझाडांच्या लागवड अंतराच्या शिफारशीनुसार योग्य लांबी, रुंदीचे खड्डे घेऊन हे खड्डे मातीने भरताना ते निर्जंतुकीकरण करून वाळलेला पालापाचोळा १५ से.मी. थरात भरावा. मातीमध्ये २०-२५ किलो चांगले कुजलेले शेणखत + २ ते ३ किलो गांडूळ खत + २ ते ३ किलो लिंबोळी पेंड २५ ग्रॅम ट्रायकोडर्मा जीवाणू + १५ ग्रॅम स्फुरद विरघळवणारे जीवाणू + २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर हे मिश्रण मिसळून घ्यावे. खड्डा जमिनीच्यावर ५ ते ७ से. मी उंच भरून ठेवावा. म्हणजे पावसाळ्याच्या सुरुवाती बरोबर लागवड करता येईल.

**कलमांची निवड व खरेदी**

शक्यतो कृषी विद्यापीठ किंवा शासकीय रोपवाटिकेमधून रोपे आणावीत. शक्य नसल्यास आपल्या माहितीतील शासकीय परवानाधारक रोपवाटिकेतून कलमे/रोपे घ्यावीत. कलमांची निवड करताना ती किती उंच आहेत, यापेक्षा ती योग्य त्या जातीच्या मातृवृक्षापासून केलेली आहेत कि नाही तया बाबींकडे अधिक लक्ष द्यावे. रोपे घेताना कलम बांधलेली आहेत व जोड पूर्णपणे जुळलेले आहेत याची खात्री करून घ्यावी.

**लागवड करताना घ्यावयाची काळजी**

कलमे किंवा रोपे खड्ड्याच्या मधोमध ठेऊन हलकेच दाबावा व मोकळ्या हाताने माती भरून गोळ्या भोवती माती टाकावी. अगोदर हाताने व नंतर पायांनी दाबावी, हे करताना मातीच्या गोळ्यावर पाय पडणार नाही याची काळजी घ्यावी.

**कलमे लावताना व आणताना होणार्‍या चुका**

* कलमांचा जोडमातीत दाबला जाणे.
* योग्य जातीची कलमे खरेदी न करणे.
* योग्य अंतरावर खड्डे न घेणे.
* बहुतांश ठिकाणी खड्डे भरताना फक्त मातीचा वापर करणे.
* रोपे/कलमे वाहतुकीच्या दरम्यान काळजी न घेणे.
* मान्यताप्राप्त नसलेल्या खाजगी नर्सरीतून कलमे खरेदी करणे.
* हवामान व जमिनीच्या प्रतिनुसार फळझाडे न निवडणे

**लागवड पध्दत व वाण निवड**

नारळ लागवड करताना सर्वात महत्वाचा मुद्दा विचारात घेणे अत्यंत आवश्यक आहे, तो म्हणजे दोन माडातील अंतर. दोन माडातील अंतर योग्य असणे आवश्यक आहे. आणि ते जर नसेल तर नारळ उशिरा लागणे किंवा न लागणे हे प्रकार घडतात.

उंच वाढणाऱ्या नारळाच्या झावळीची लांबी १५ फुट असते. वजनामुळे झावळी धनुष्यासारखा आकार घेतो. त्यामुळे झावळीचा देठ ते शेंड्यापर्यंत सरळ अंतर १२.५ फुट असते. म्हणून दोन माडात ७.५ मीटर अंतर असेल तर माडाच्या झावळ्या एकमेकात शिरणार नाही. शेताच्या किंवा कुंपणाच्या कडेने नारळ लागवड करताना ६.७५ किंवा सात मीटर अंतर ठेवावे. बुटक्या जातीसाठी सहा मीटर अंतर चालू शकते.

लिंबू लागवड करण्यासाठी मध्यम काळी, हलकी, मुरमाड, पाण्याचा निचरा होणारी, उदासीन सामू असणारी जमीन उपयुक्त ठरते. मात्र, जमिनीमध्ये चुनखडी १० टक्क्यापेक्षा कमी असलेली जमीन लागवडीसाठी उपयुक्त असते. लिंबूलागवडीसाठी साई सरबती, फुले शरबती इत्यादी सुधारित जातींची निवड करू शकतो. लिंबाची लागवड करण्यासाठी ०६ ०६ मीटर अंतरावर करावी.

अवर्षण प्रवण किंवा कोरडवाहू विभागासाठी वरदान असलेले चिंचेचे लागवड मुद्दा फायदेशीर ठरू शकते. सातारा जिल्ह्यात नव्याने चिंचेची लागवड करण्याचे प्रमाण कमी आहे. चिंचेच्या फळ इतर फळांच्या तुलनेत कमी नाशवंत असल्याने दिर्घकाळ टिकवून ठेवणे सोपे आहे. उत्पादकता वाढविण्यासाठी

कलम केलेल्या सुधारित वाणजसेकि प्रतिष्ठान, स्मृती व पीकेएम - १ झाडं लावल्यामुळे कमी कालावधीत झाडाला फळे येतात.

प्रतिष्ठान या चिंचेच्या फळांची सरासरी लांबी ७.५ से.मी. व आकार सरळ असतो. गराचा रंग विटकरसर तांबडा. एक किलो कच्च्या चिंचेपासून ६०० ग्राम गर मिळतो व गरात आमलता ९.२१ टक्के असते.

**सघन लागवड पद्धत**

उपलब्ध साधन सामग्री व जमीन याचा पुरेपूर वापर होण्यासाठी शेतकरी आंबा व पेरू लागवडीसाठी सघन पद्धतीने झाडे लागवड करीत आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्या शिफारशीनुसार छाटणी व वळण देणे हे दोन मुद्दे जर शास्त्रोक्त पद्धतीनुसार व्यवस्थित केले तर आंबा ५ ५ मीटर व पेरू ३ २ मीटर वर लागवड करणे फायदेशीर आहे. यामध्ये पारंपरिक पद्धतीपेक्षा या लागवडपद्धतीमुळे एकरी झाडांची संख्या वाढते. आंबा पारंपारिक पद्धतीने ३३ ३३ फूट अंतरावर लागवड केल्याने अधिक जमीन अडकून राहून झाडांची एकरी संख्याही कमी बसते. सुरवातीची अनेक वर्षे विस्तार कमी म्हणून उत्पादन कमी, नंतर झाडे वाढली किंवा रोगकीडीने व्यापली तर उत्पादन कमी येते. शिवाय अधिक अंतरावरील झाडे १५-२० वर्षांनी विस्तारीत व उंच होतात, त्यामुळे मोहोराचे रक्षण करणे व फळे उतरवणे अवघड होते. यासाठी उत्तम उपाय म्हणजे एकरी जास्त झाडे बसवून लागवड केल्यास अधिक उत्पादन मिळवता येते. जमीन (पोत, प्रत, खोली, उतार) आणि निवडलेली जात यांचा विचार करूनच अंतर ठरवावे.

डाळिंब बागेमध्ये काही शेतकरी कृषी विद्यापीठाच्या शिफारशीत अंतराचा अवलंब न करता झाडे जवळजवळ लावतात. नंतर याठिकाणी तेलकट डाग आणि मर रोगाचा प्रादुर्भाव झालेला दिसून येत आहे. म्हणून डाळिंब लागवड ४.५ ३ मीटर अंतरावर लागवड करावी.

शेतीमधून निश्चित स्वरूपाचे उत्पादन पारंपरिक पिकांसोबतच शेतीमधून निश्चित स्वरूपाने उत्पादन मिळावे, यासाठी अधिकाधिक शेतकऱ्यांनी शासकीय योजनेतून फळपिकांची लागवड करावी. अधिक माहितीसाठी कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी अथवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क करावा.



भूषण यादगीरवार
कृषि विज्ञान केंद्र बोरगाव